MHAU060014672025

## दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३५४/२०२५

## नि. क्र. ०१ खालील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ नुसार वारसा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे–**

२. अर्जदार क्रं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे जगदीश वल्लभभाई पटेल हे होते. ते दिनांक १४.०७.२०२३ रोजी मौजे ओढे, ता. व जि. आनंद, गुजरात येथे मयत झाले आहेत. मयताची आई नामे शारदाबाई वल्लभभाई पटेल या दिनांक १७.१०.१९७६ रोजी तर वडील वल्लभभाई हिमाबाई पटेल हे दिनांक ०२.०१.२०१३ रोजी मयत झालेले आहेत. मयत जगदीश वल्लभभाई पटेल, जितेंद्र गोवर्धन पटेल व अशोक जमनादास पटेल यांच्या नावे एकत्रितरित्या मौजे टिळकनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे जुना नगरपालिका क्र. ३/८ व नवा नगरपालिका क्र. ३/१० असा असलेला दक्षिणोत्तर ९० व पुर्व–पश्चिम २७ एकुण क्षेत्र २२५.६६ चौरस मिटर अशी मिळकत आहे. त्याच्या चर्तुसिमा पुर्वेस– लक्ष्मण आप्पा मुळे यांचे घर, पश्चिमेस सार्वजनिक अंगण, उत्तरेस, सरकारी रस्ता व प्राथमिक शाळा आणि दक्षिणेस सरकारी रस्ता अशा आहे. सदर मिळकतीमध्ये मयत जगदीश वल्लभभाई पटेल ,जितेंद्र गोवर्धन पटेल व अशोक जमनादास पटेल यांचा प्रत्येकी १/३ असा हिस्सा आहे. त्यामुळे जगदीश वल्लभभाई पटेल यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्रमांक १ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारस

असुन त्यांना प्रस्तुतच्या मिळकतीमधील मयताच्या नावे असलेला १/३ हिस्सा त्यांच्या नावे करण्यासाठी त्यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जाची नोटीस दि. ३०.०७.२०२५ रोजीच्या दैनिक 'सामपत्र' या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन अर्जातील मागणीबाबत हरकती मागविल्या. परंतु त्या अनुषंगाने कुणीही त्रयस्थ व्यक्तीनी न्यायालयात हजर होवून सदर अर्जाबाबत विहित कालावधीत कोणताही उजर नोंदविलेला नाही.

४. माझे समोर अर्ज निर्णित करण्यास खालील मुद्दे विचारधीन झाले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी त्याखाली नमुद करणमिमांसेसहित नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार हे मयत जगदीश वल्लभभाई पटेल यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत हे शाबीत करतात काय? | होकारार्थी |
| ०२. | अर्जदार हे मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ०३. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**<u>:– का र ण मि मां सा –:</u>**

५. अर्जाच्या पुष्ट्यर्थ अर्जदार क्र. ३ यांनी न्यायालयात हजर होवून स्वतःचा पुरावा दाखल केला व त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जातील कथनांचा पुनःरुच्चार केला आहे. तसेच त्यांनी मयत जगदीश वल्लभभाई पटेल, शारदाबाई वल्लभभाई पटेल आणि

वल्लभभाई हिमाभाई पटेल यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची प्रत, अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या ओळखपत्रांच्या प्रती, अर्जदार क्र. २ व ४ यांच्या विवाहपुर्वी नावासंबंधाने त्यांचे शाळा सोडल्याचे दाखला, पॅन कार्ड व मतदान कार्ड, उपरोक्त मिळकतीचा नगरपालिका कन्नड यांनी दिलेला उतारा, मिळकतीचे खरेदीखत, मिळकतीचे मुल्यांकन प्रमाणपत्र, हस्तांतरणाची नोटीस, मिळकतीचे सहमालक अशोक पटेल यांचे शपथपत्र आणि दैनिक 'सामपत्र' या दैनिक वृत्तपत्राची दिनांक ३०.०७.२०२५ रोजीची प्रत कागदपत्राच्या यादीसोबत दाखल केली आहेत.

६. अर्जदार यांचा अर्ज, त्यामधील मागणी बाबत स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटिस देऊन हरकती मागविल्या होत्या. परंतु प्रस्तुत अर्ज व त्यामध्ये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने न्यायालयात कोणीही हजर होऊन हरकत घेतलेली नाही. अर्जदारांनी सादर केलेला लेखी व तोंडी पुरावा कोणीही आव्हानीत केलेला नाही. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा कोणीही आव्हानीत केला नसल्याने त्यावर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या अर्जातील अभिकथनांचा आणि न्यायालयासमोर सादर केलेला पुरावा यांचा सारासार विचार करता अर्जदार हे मयत जगदीश वल्लभभाई पटेल यांचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे उपरोक्त मिळकतीमधील मयताच्या नावे असलेला १/३ हिस्सा अर्जदारांच्या नावे करण्यासाठी त्यांना वारस दाखला देणे उचित होईल. करीता मी मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २ | अर्जदार क्र. १ बकुळा जगदीश पटेल या पत्नी या नात्याने, अर्जदार |

| | |
|---|---|
| | क्र. २ पलक निरज सावकारे या मुलगी या नात्याने, अर्जदार क्र. ३ निलय जगदीश पटेल हे मुलगा या नात्याने आणि अर्जदार क्र. ४ जिग्ना चिराग पटेल या मुलगी या नात्याने मयत **जगदीश वल्लभभाई पटेल** यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असे जाहिर करण्यात येवुन उपरोक्त अर्जदारांना मयत जगदीश वल्लभभाई पटेल, जितेंद्र गोवर्धन पटेल व अशोक जमनादास पटेल यांच्या नावे एकत्रितरित्या मौजे टिळकनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे जुना नगरपालिका क्र. ३/८ व नवा नगरपालिका क्र. ३/१० असा असलेला दक्षिणोत्तर ९० व पुर्व–पश्चिम २७ एकुण क्षेत्र २२५.६६ चौरस मिटर ही मिळकत , त्याची चर्तुसिमा पुर्वेस– लक्ष्मण आप्पा मुळे यांचे घर, पश्चिमेस सार्वजनिक अंगण, उत्तरेस, सरकारी रस्ता व प्राथमिक शाळा आणि दक्षिणेस सरकारी रस्ता अशा आहे. सदर मिळकतीमधील मयत जगदीश वल्लभभाई पटेल यांचा १/३ असलेला हिस्सा हा अर्जदारांच्या नावे करणेसाठी प्रस्तुतचा वारस दाखला देण्यात येत आहे. |
| ३. | प्रस्तुत प्रमाणपत्राचा वापर फक्त अर्जात नमुद केलेल्या कारणांसाठी केला जाईल. याव्यतिरीक्त प्रस्तुत प्रमाणपत्राचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी केला जाणार नाही. |

NITIN DHOKE
Digitally signed by NITIN DHOKE
Date: 2026.08.13 16:31:06 +0530

दिनांक:–१३.०८.२०२६

**( एन. आर. ढोके)**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**कन्नड**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rajesh M. Sonawane |
| Name of the Court | : | Shri. N. R. Dhoke<br>Jt. Civil Judge Junior Division, Kannad. |
| Date of the pronounce of order | : | 13.08.2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 13.08.2026 |
| Order uploaded on | : | 13.08.2026 |